औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची गुरुवार दि. १९.८.९३ रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या ८५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वरराव भोसीकर | सभापती, औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. भास्कर मुंढे | उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३] श्री. दे. हि. मुन, उपसंचालक, नगररचना, औरंगाबाद | सदस्य |
| ४] श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरु चारठाणकर | सदस्य |
| ५] श्री. व. शा. राजभोज कार्यकारी अभियंता, म. न. पा, औरंगाबाद [आयुक्त, म. न. पा. औबाद] | यांचे सदस्य प्रतिनिधी. |

विषय क्र. १: दि. २१.७.९३ रोजी झालेल्या ८४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

ठराव क्र. ४९९

औरंगाबाद मंडळाने दिनांक २१.७.९३ रोजी झालेल्या ८४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावर चर्चा होऊन सदर कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २:

असाधारण परिस्थिती केलेल्या वैद्यकीय खर्चाची परिपुर्ती करणेबाबत.

....

ठराव क्र. ५००

मंडळाने सदर विषयावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेतला की, श्री. डी. टी. सानप वरिष्ठ लिपिक यांचा मुलगा गंभीर आजारी असल्याने त्यास रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दाखल असतांना रु. ९३४ इतका खर्च आला आहे. श्री. सानप यांना प्राधिकरणाच्या नियमानुसार रु. ७०२/- अनुज्ञेय आहे. सदर रक्कम प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अदा करावी.

[७] ५

विषय क्र. ३:

८२ गाळे उच्च उत्पन्न गट योजना मुकुंदवाडी औरंगाबाद विक्री किंमतीबाबत.

---

या विषयावर चर्चा करतांना मुख्य लेखा अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, ८२ गाळ्यांची जाहिरात देतांना गाळ्यांची किंमत रु. १,७५,०००/- जाहीर केली होती. परंतु प्रत्यक्षात सदरहू गाळ्यांची योजना उच्च उत्पन्न गट [अ] व उच्च उत्पन्न गट [ब] अशा दोन प्रकारे तयार करण्यांत आलेली असून उच्च उत्पन्न गट [अ] भूखंडाचे क्षेत्रफळ कमीत कमी १४० चौ.मी. तर उच्च उत्पन्न गट [ब] भूखंडाचे क्षेत्रफळ ११२ चौ.मी इतके आहे असे मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले. पुढे असे सांगितले की, "अ" व "ब" चे प्रत्यक्षात बांधकाम क्षेत्रफळ सारखेच असले तरी गाळ्यांची किंमत सरसकट एकच ठेवणे योग्य होणार नाही. जर किंमत सारखीच ठेवली तर "ब" टाईपमधील गाळेधारक कमी भूखंड मिळाल्यामुळे वाद निर्माण करण्याची शक्यता मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केली. किंमतीची वाढ कशा प्रकारे झाली हे ही मंडळास विस्तृतपणे सांगितले.

चर्चेत भाग घेतांना सभापती औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, गाळ्यांची घोषित केलेल्या किंमतीपेक्षा जर किंमत जास्त वाढली तर लोक नाराज होतील व यर्या याने लाभधारकांना समाधानकारक उत्तर देणे मंडळास अशक्य होईल.

चर्चेत भाग घेतांना उपसंचालक नगररचना औरंगाबाद विभाग, सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी अशी विचारणा केली की, गाळ्याच्या किंमतीत एवढा फरक कसा पडतो.

यावर उपसभापती औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, सुरुवातीस योजना तयार करतांना बऱ्याचशा बाबींचा खर्च अंतर्भूत नव्हता व त्या आता अंतर्भूत कराव्या लागल्या. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे विद्युत पुरवठ्यासाठी मंडळाने जे पैसे भरले होते. त्यापेक्षा जास्त पैसे विद्युत मंडळाने मंडळाकडे मागणी केली. सिडकोने न्युडल चार्जेस व विकास खर्चाची मागणी केलेली आहे. या सर्व बाबींमुळे गाळ्यांच्या किंमतीत वाढ झालेली आहे.

अशा प्रकारे वाढलेल्या किंमतीमुळे गाळेधारकांना उत्तर देणे फारच कठीण आहे असे उपसभापतींनी सांगितले.

गाळ्यांच्या किंमतीत, इतर बाबी अंतर्भूत झाल्यामुळे वाढ झालेली असल्याने सुरुवातीस गाळ्यांची जाहिरात देतांना विचारात घेतलेला नफा तेवढाच ठेवण्यांत यावा असे प्रतिपादन केले.

यावर चर्चा करतांना मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, सिडकोने मंडळाच्या ८२ गाळ्यांच्या वसाहतीस काहीच सुविधा पुरविल्या नसल्यामुळे जो विकास खर्च व न्युडल चार्जेस आकारला आहे तो माफ करण्यासाठी प्राधिकरणाच्या स्तरावरुन सिडकोच्या वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार करावा व त्या प्रकरणी तडजोड घडून आणण्यासाठी मंडळातर्फे प्राधिकरणास प्रस्ताव पाठवावा.

उपसभापतींनी मंडळास सांगितले की, या वसाहतीस सिडकोकडून पाणीपुरवठा मिळत नाही. त्यामुळे गाळे वाटपासाठी विलंब होत आहे. त्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडे पाणीपुरवठ्यासाठी पाठपुरावा करण्यांत येत आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने कमर्शियल रेटने [व्यापारी तत्वाने]पाणीपुरवठा करण्यांत येईल असे सांगितले.

सभापती, औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, गाळेधारकांना ऑफर देतांना त्याच फार्मात स्पष्टपणे नमुद करावे की, सिडकोने न्युडल चार्जेस व विकास खर्चापोटी आकारलेली रक्कम जर सिडकोने माफ केली तर तेवढी रक्कम गाळ्यांच्या किंमतीतुन कमी करण्यांत येईल.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतले.

ठराव क्र. ५०१

१] सिडकोने ज्या जमिनी गृहनिर्माण योजनेसाठी दिलेल्या आहेत त्या जमिनीवर ज्या योजना राबविल्या आहेत त्या वसाहतीस सुविधा न पुरवीता विकास खर्च व न्युडल चार्जेस आकारले आहेत ते माफ करुन घेण्यासाठी प्राधिकरणस्तरावर सिडकोच्या वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यासाठी मंडळातर्फे प्रस्ताव पाठवावा.

२] गाळ्यांची जाहिरात देतांना जेवढा नफा विचारात घेतला होता तेवढाच नफा विचारात घेण्यांत यावा व उच्च उत्पन्न गट [अ] आणि [ब] साठी वेगवेगळी गाळ्यांची किंमत लाभधारकांना कळविण्यांत यावी.

तसेच गाळेधारकांना ऑफर देतांना स्पष्ट नमुद करावे की, सिडकोने न्युडल चार्जेस व विकास खर्च माफ केल्यास गाळ्यांच्या किंमतीतून तेवढी रक्कम कमी करण्यांत येईल अन्यथा त्या रक्कमेचा गाळ्यांच्या किंमतीत अंतर्भाव राहील.

विषय क्र. ४

म्हाडाच्या गाळ्यांची किंमत निश्चित करतांना आकारावयाच्या नफ्याबाबतचे धोरण.

वरील विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने.

ठराव क्र. ५०२

एकमताने निर्णय घेतला की, गृहनिर्माण भवना जवळील उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधलेल्या २४ गाळ्यांपैकी १६ गाळ्यांच्या किंमतीत होणारी वाढ लक्षात घेऊन प्राधिकरणाचे निर्णयानुसार असलेला कमाल नफा न आकारता कमीत कमी असलेला १५% नफा सदरहू गाळ्यांसाठी आकारावा.

मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेचा विषय.

[१] औरंगाबाद मंडळाचे सन १९९२-९३ चे वार्षिक लेखे.

वरील बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने

ठराव क्र. ५०३

एकमताने निर्णय घेतला की, औरंगाबाद मंडळाने सन १९९२-९३ चे वार्षिक लेखे बाब टिप्पणीत दाखविल्याप्रमाणे मंजूर करण्यांत येत आहेत. सदर लेख्यास मान्यता समजून कायम करण्यासाठी पुढील बैठकीसमोर न ठेवता आताच कायम करण्यांत आला असे समजून लेखे त्वरीत वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांचेकडे पुढील कार्यवाही करिता पाठविण्यांत यावेत.

सभापतींचे व उपस्थित पदाधिकाऱ्यांचे आभार मानून बैठक संपली.

.....